**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार  दिनांक १२ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **दिल्ली स्फोट प्रकरणाचा तपास वेगानं सुरू, तपासयंत्रणांचे देशभरात छापे**
2. **शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष यांच्या पक्षचिन्हावरील वादाबाबत अंतिम सुनावणी 21 जानेवारी 2026 रोजी होणार**
3. **आज जागतिक न्यूमोनिया दिन/ महाराष्ट्रात  राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आज पासून  28 फेब्रुवारी पर्यंत  जागरूकता कार्यक्रम**
4. **विदर्भात थंडीचा जोर वाढला, गोंदिया जिल्ह्यात किमान तापमान  १० पूर्णांक ५  दशांश अंश सेल्सियस**

**-----------------------------------------------**

**दिल्ली स्फोट तपास**

दिल्ली स्फोट प्रकरणाचा तपास वेगानं सुरू आहे. राष्ट्रीय तपास संस्था - एनआयए आणि सुरक्षा यंत्रणांनी राष्ट्रीय राजधानी क्षेत्र तसंच जम्मू-काश्मीरमधल्या पुलवामा आणि कुलगामसह अनेक ठिकाणी मोठी कारवाई केली. कुलगाम पोलिसांनी २०० हून अधिक ठिकाणी छापे टाकले आहेत.  दरम्यान, या कार स्फोटाचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. या स्फोटात वापरण्यात आलेली कार अमित नावाच्या डीलरकडून खरेदी करण्यात आली होती, त्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.या प्रकरणातली संशयित डॉ शाहीन शाहीद हिचा भाऊ परवेझ अन्सारी याच्या लखनौमधल्या घरावर उत्तप्रदेश एटीएसने कारवाई केली असून तिथून मोबाईल फोन्स सह इतर यंत्रसामुग्री जप्त केली. महाराष्ट्र एटीएस दहशतवादविरोधी पथकानं मुंब्रा इथून एका संशयिताला अटक केली आहे. त्याच्या घरातून अनेक इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल उपकरणं जप्त करण्यात आली आहेत. जप्त केलेल्या वस्तूंचा तपास केला जात असल्याचं एटीएसनं सांगितलं.

-----------------------------------------------

**कालचक्र उत्सव**

भूतानचा दोन दिवसांचा दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मायदेशी परतले.पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भूतान नरेश जिग्मे खेसार नामग्येल वांगचुक यांनी आज थिंपू इथं कालचक्र उत्सवाचं संयुक्तपणे उद्घाटन केलं. हा जागतिक शांततेसाठी प्रार्थना करण्याचा पारंपरिक बौद्ध उत्सव बौद्ध धर्मगुरु, ‘जे खेनपो’ यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. या दौऱ्यात दोन्ही देशांच्या नेत्यांनी द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली. भूतानच्या ऊर्जा प्रकल्पांसाठी सवलतीच्या दराने ४० अब्ज रुपये पतपुरवठा करण्याची घोषणा मोदींनी केली आहे . नवीकरणीय ऊर्जा,, आरोग्य अशा महत्त्वाच्या क्षेत्रात ३ सामंजस्य करारांवर प्रधानमंत्र्यांच्या या दौऱ्यात स्वाक्षऱ्या झाल्या.

-----------------------------------------------

**लोक सेवा प्रसारण दिवस**

आज सार्वजनिक प्रसारण सेवा दिवस आहे. १९४७ मधे फाळणीनंतर भारतात आलेल्या विस्थापितांना याच दिवशी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी दिल्लीच्या ऑल इंडिया रेडियोवरुन संबोधित केलं होतं. या ऐतिहासिक दिवसाची आठवण म्हणून १२ नोव्हेंबर हा दिवस सार्वजनिक प्रसारण सेवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.
ऐकुया महात्मा गांधी यांच्या रेडिओ संबोधनाचा अंश

-----------------------------------------------

**शिवसेना सुनावणी**

सर्वोच न्यायालयानं आज शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष यांच्या पक्षचिन्हावरील वादाबाबत अंतिम सुनावणी 21 जानेवारी 2026 रोजी घेण्याच निश्चित केलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षा तर्फे दाखल केलेल्या याचिकेत निवडणूक आयोगानं एकनाथ शिंदे गटाला अधिकृत शिवसेना म्हणून मान्यता देत ‘धनुष्यबाण’ हे निवडणूक चिन्ह देण्याच्या निर्णयाला आव्हान देण्यात आलं आहे. ही याचिका

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बॅगची यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणीस आली. या संदर्भातली सुनावणी येत्या २ डिसेंबरला होणार होती. मात्र, राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर ही सुनावणी वेळेआधी घ्यावी, अशी विनंती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने केली होती.

---------------------------------------------

**बिहार निवडणूक**

बिहार विधानसभेच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी काल मतदान झालं. या टप्प्यात ६९ टक्क्यापेक्षा जास्त मतदान झाल्याचं निवडणूक आयोगानं सांगितलं. पहिल्या टप्प्यात ६५ टक्के मतदान झालं होतं, त्यामुळे दोन्ही टप्पे मिळून बिहार विधानसभा निवडणुकीत एकूण ६६पूर्णांक ९१ शतांश टक्के इतकं मतदान झालं आहे. बिहारमधे आतापर्यंत झालेल्या सर्व निवडणुकांमधे यंदा सर्वात जास्त मतदान झालं आहे. १४ नोव्हेंबरला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

---------------------------------------------

**सरकारी खरेदी**

राज्य शासनाने सोयाबीनची हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. सोयाबीनचा हमीभाव 5 हजार 328 रुपये आहे. कृषि उत्पन्न बाजार समिती मार्फत 15 नोव्हेंबर पासुन सोयाबीनची खरेदी केली जाणार आहे. वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट आणि समुद्रपूर वगळता 6 खरेदी विक्री केंद्रावर आणि 7 कृषि उत्पन्न बाजार समिती मार्फत ही खरेदी केली जाणार असून यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु आहे.

बुलढाणा जिल्ह्यात नाफेड आणि विदर्भ को-ऑफ मार्केटिंग फेडरेशनतर्फे शेतकऱ्यांच्या सोयाबीन, उडीद आणि मूग या शेतमालाची हमीभावाने खरेदी सुरू झाली आहे. मूगाला ८ हजार ७६८ रुपये आणि उडीदला ७ हजार ८०० रुपये दर मिळत असल्याने शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली आहे. खामगाव, मलकापूर, जळगाव जामोद, सोमठाणा आणि पातुर्डा या पाच केंद्रांवर नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. अमरावती जिल्ह्यातील केंद्रांवर आतापर्यंत ८ हजार २४७ शेतकऱ्यांनी अर्ज दाखल केले असून, त्यापैकी ३

हजार ९७४ शेतकऱ्यांची पोर्टलवर प्रत्यक्ष नोंदणी झाली आहे. एकूण १५ केंद्रांपैकी ८ केंद्रे नाफेडद्वारे चालवली जातील, तर उर्वरित ७ ठिकाणी विदर्भ को-ऑप. मार्केटिंग फेडरेशनतर्फे खरेदी केली जाईल.

-----------------------------------------------

**न्यूमोनिया दिन**

जागतिक न्यूमोनिया दिन आज पाळण्यात येत आहे. 5 वर्षाखालील बालकांना न्युमोनियापासून सुरक्षित ठेवण्यासाठी आणि यामुळे होणारे बालमृत्यु कमी करण्यासाठी महाराष्ट्र राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत दि.12 नोव्हेंबर ते 28 फेब्रुवारी या कालावधीत सामाजिक जागरूकता आणि न्यूमोनिया निष्प्रभ करण्यासाठी (Saans) सांस अभियान राबविण्यात येत आहे. देशातील एकुण बालमृत्युपैकी सरासरी 16.3 टक्के मृत्यु हे न्युमोनियामुळे होतात. या गंभीर आजाराचा प्रतिबंध,लवकर निदान आणि उपचार यावर अभियानात भर दिला जात आहे.न्यूमोनिया दिनानिमित्त जारी केलेल्या संदेशात केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी बालकांचं न्यूमोनियापासून संरक्षण करण्यासाठी सरकारच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. सरकारने मजबूत आरोग्य व्यवस्था आणि सामुदायिक जागरूकरेद्वारे न्यूमोनिया कमी करण्यासाठी उपक्रम सुरू केल्याचं त्यांनी सांगितलं. ‘न्यूमोनिया नही, तो बचपन सही’ हा संदेश या आजाराचा प्रतिबंध आणि वेळेवर काळजी घेण्यासाठी सामूहिक कृतीला प्रेरणा देत असल्याचं नड्डा यांनी नमूद केलं.

दरम्यान स्थानिक फुफ्फुस रोगतज्ज्ञ डॉ. विक्रांत देशमुख यांनी आकाशवाणी सोबत निमोनियाची लक्षणे आणि उपाय यावर बातचीत केली -

***(होल्ड बाईट - डॉ. विक्रांत देशमुख ३६ सेकंद)***

***निमोनियाचे लक्षण म्हणजे वारंवार खोकला येणे, ताप येणे, उलटी व जुलाब होणे किंवा खोकलताना छातीत दुखणे. छातीत पाणी भरणे असे असतात. निमोनियामुळे फार लोकांचा घात होऊ शकतो आणि जर त्याचा वेळेवर उपचार झाला तर साध्या ॲटिबायोटिक्ससुद्धा तो बरा होऊ शकतो म्हणून निमोनियाचे लक्षण जर आढळले तर त्याला आपण लवकरात लवकर उपचार करणे आवश्यक आहे. वेळेत वर्गीकरण होणे पण महत्वाचे आहे. जर आपल्याला डायबिटीज किंवा किडनीचा आजार किंवा***

***वय 65 वर्षाच्या वरती असेल तर अशा लोकांनी निमोनियाची बचाव करण्यासाठी निमोनियाची लस दरवर्षी लावून घ्यायला पाहिजे.***

-----------------------------------------------

**प्रवेश परीक्षा**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आगामी शैक्षणिक वर्षात पीसीएम, पीसीबी आणि एमबीए या तीन अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा (सीईटी) दोन वेळेस घेणार असून पहिली प्रवेश परीक्षा एप्रिल मध्ये तर दुसरी प्रवेश परीक्षा मे महिन्यात होणार आहे, अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज केली.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सीईटी परीक्षा संदर्भात आढावा बैठक आज घेण्यात आली.

-----------------------------------------------

**पक्षी सप्ताह**

भंडारा जिल्ह्यात वन विभागाच्या वतीने पक्षी सप्ताह उत्साहात साजरा केला जात आहे. या निमित्ताने तलाव परिसरात नागरिकांना पक्ष्यांविषयी जनजागृती करण्यात येत असून विद्यार्थी आणि नागरिकांसोबत जंगलात पक्षी निरीक्षण उपक्रम राबवले जात आहेत.

-----------------------------------------------

**पक्षी उत्सव**

प्रसिद्ध भारतीय पक्षी शास्त्रज्ञ डॉ. सलीम अली यांच्या जयंतीनिमित्त पक्षी दिवस साजरा करण्यात येतो. नोव्हेंबर महिना पक्षी संवर्धनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण मनला जातो. बुलढाणा जिल्ह्यात पक्षी संवर्धनात उत्कृष्ट कार्य करणारे पक्षी प्रेमी संजय गुरव यांनी विविध पक्षांच्या निवाऱ्यासाठी कृत्रिम घरटी तयार केली असून त्यात हे पक्षी आपलं स्थान निश्चित करण्यासाठी येत असल्याचं पहावयास मिळत आहेत.

-----------------------------------------------

**महावितरण राज्यस्तरीय क्रीडा**

महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेला अमरावतीत उत्साहपूर्ण सुरुवात झाली आहे यात १६ परिमंडलांतील ११७० खेळाडू २२ खेळ प्रकारांत सहभागी झाले आहेत. १०० मीटर धावस्पर्धेत गुलाबसिंग वसावे आणि प्रिया पाटील यांनी सुवर्णपदक पटकावत आपलं वर्चस्व सिद्ध केलं.

---------------------------------------------

**हवामान**

विदर्भात गोंदिया जिल्ह्यात आज सर्वात कमी किमान तापमान दहा पूर्णांक पाच दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. गोंदियाच्या पाठोपाठ यवतमाळ इथं दहा पूर्णांक सहा तर वाशीम इथं 11 पूर्णांक सहा अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. अन्य जिल्ह्यांमध्ये देखील तापमान 11 ते 13 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. विदर्भात थंडीचा जोर वाढत असून अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमानात सातत्यपूर्ण घट नोंदवली जाते आहे. नागपुरात आज बारा पूर्णांक सहा अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवलं गेलं. सर्वाधिक किमान तापमान चंद्रपूर इथं 13. 6 अंश सेल्सिअस इतकं होतं, तर सर्वाधिक कमाल तापमान अमरावतीत 31. 8 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. येत्या 16 तारखेपर्यंत सर्वत्र हवामान शुष्क राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवला आहे.

---------------------------------------------